**नोंदणी व मुद्रांक विभागाच्या रेडी रेकनरमधील मार्गदर्शक सूचना विचारात न घेता केवळ वार्षिक बाजारमूल्य दरानुसार मोबदल्याच्या रकमेची परिगणना करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन शुद्धीपत्रक, क्र.-संकीर्ण-०३/२०१८/प्र.क्र.४३(भाग-१)/अ-२**
मंत्रालय, मुंबई
दि. १० सप्टेंबर, २०१८.

**वाचा**:- शासन परिपत्रक, क्र.-संकीर्ण-०३/२०१८/प्र.क्र.४३/अ-२, दि.१३.०८.२०१८.

**शासन शुद्धीपत्रक :-**

उपरोक्त संदर्भाधिन शासन परिपत्रक दि.१३.०८.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर शासन परिपत्रकासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिपत्याखालील संबंधित अधिकाऱ्यांकडून याबाबत स्पष्टीकरणात्मक विचारणा वारंवार करण्यात येत आहे. त्यामुळे त्यास अनुसरून शासन संदर्भाधिन शासन परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

संदर्भाधिन शासन परिपत्रकामधील 'शासन परिपत्रक' याशिर्षाखालील 'भूसंपादन प्रकरणात मोबदल्याच्या .................................करण्यात यावी.' याऐवजी -भूसंपादन अधिनियम, २०१३ (RFCTLARR Act, २०१३) मधील कलम २६ ते ३० च्या तरतुदीप्रमाणे जमिनीचा मोबदला परिगणित करण्याची कार्यपद्धती नमुद करण्यात आलेली आहे. त्यामधील कलम २६(१) प्रमाणे जमिनीचे बाजारमुल्य निर्धारीत करतांना व निश्चित करतांना कलम २६(१)(a) साठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ६९ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार निर्गमित केवळ वार्षिक बाजारमूल्य दराचा आधार घेऊन करण्यात यावी. यामध्ये खरेदी विक्री व्यवहार जास्त रकमेचे असल्यास अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी, असे वाचावे.

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०९१०१६३९०३५९१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f59754b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2018.09.10 17:15:56 +05'30'

**(सुभाष कि. गावडे)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. अ.मु.स. (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. व्यवस्थापकीय संचालक सिडको, सिडकोभवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मंबई
१६. मा.महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
१९. सर्व विभागीय आयुक्त
२०. सर्व जिल्हाधिकारी
२१. प्रादेशिक अधिकारी, मुंबई, महाराष्ट्र,भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई
२२. प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर प्रादेशिक कार्यालय, नागपूर-४४००३३
२३. महाव्यवस्थापक (भूमि व सर्वेक्षण), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या.,मुंबई.
२४. संचालक, नगर रचना, पुणे
२५. सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा )
२६. निवडनस्ती (अ-२)

नोंदणी व मुद्रांक विभागाच्या रेडी रेकनरमधील मार्गदर्शक सूचना विचारात न घेता केवळ वार्षिक बाजारमूल्य दरानुसार मोबदल्याच्या रकमेची परिगणना करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.-संकीर्ण-०३/२०१८/प्र.क्र.४३/अ-२**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. १३ ऑगस्ट, २०१८.

**<u>प्रस्तावना :-</u>**

महाराष्ट्र राज्यामध्ये विविध प्रकल्पांसाठी सार्वजनिक प्रयोजनाकरिता खाजगी जमीन संपादनाची कार्यवाही वेगवेगळ्या अधिनियमांच्या तरतुदीनुसार करण्यात येते. सदर अधिनियमांच्या तरतुदीप्रमाणे जमिनीचे मूल्यांकन करताना वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब संबंधित भूसंपादन अधिकाऱ्यांकडून करण्यात येत असल्यामुळे मोबदल्याच्या परिगणनेमध्ये एकसमानता राहत नव्हती. त्यामुळे भूधारकांना मिळणारी मोबदला रक्कम ही कमी-जास्त होत होती व त्याचा परिणाम म्हणून संबंधित भूधारकांमध्ये नाराजी निर्माण होऊन संबंधित प्रकल्पाच्या कामामध्ये अडथळा निर्माण केला जात होता. परिणामी संबंधित प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास विलंब होत होता. या बाबी विधानमंडळ प्रश्न / लोकप्रतिनिधींकडून प्राप्त होणारी निवेदने व इतर मार्गाने वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणण्यात आलेल्या आहेत. संबंधित प्रकल्पासाठी संपादित केल्या जाणाऱ्या जमिनीसाठी संबंधित भूधारकांना योग्य मोबदला मिळावा व त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे अन्याय होऊ नये यासाठी संपादित होणाऱ्या जमिनीसाठी मोबदल्याची परिगणना करण्याच्या कार्यपद्धतीमध्ये एकवाक्यता असणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे निश्चित व योग्य कार्यपद्धती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सर्वंकष विचारविनिमय करुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे-

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

विविध प्रकल्पांसाठी सार्वजनिक प्रयोजनाकरिता संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीसाठी मोबदला निश्चित करतांना खालील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

‘भूसंपादन प्रकरणात मोबदल्याच्या रकमेची परिगणना महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ६९ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार निर्गमित केवळ वार्षिक बाजारमूल्य दराचा आधार घेऊन करण्यात यावी.’

सदरहू शासन परिपत्रक महसूल व वन विभाग/म-१ शाखा अनौ.संदर्भ क्र.मुद्रांक-२०१८/ अनौ.१९/म-१, दि.१७.०५.२०१८ आणि वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.२४३/२०१८/व्यय-९, दि.३०.०६.२०१८ च्या अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र २०१८०८१३१३४५०३५४१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f5975 4b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2018.08.13 13:48:37 +05'30'

**( सुभाष कि. गावडे )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९) अ.मु.स. (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) व्यवस्थापकीय संचालक सिडको यांचे स्वीय सहायक, सिडकोभवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मंबई
१६) महानगर आयुक्त यांचे स्वीय सहायक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई
१८) व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
१९) सर्व विभागीय आयुक्त
२०) सर्व जिल्हाधिकारी
२१) प्रादेशिक अधिकारी, मुंबई, महाराष्ट्र,भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई
२२) प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर प्रादेशिक कार्यालय, नागपूर-४४००३३
२३) महाव्यवस्थापक (भूमि व सर्वेक्षण), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या.,मुंबई.
२४) संचालक, नगर रचना, पुणे
२५) सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा)
२६) निवडनस्ती (अ-२).